# राशिभविष्य - ऑगस्ट, २०२०.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. वाचकांनी आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा श्रद्धेने मनापासून उपाय म्हणून उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी , अडथळे, व्याधी, आजार, पीडा, अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही प्रयत्न करून पाहावा आणि आपणांस तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे, ही विनंती.**

================================================================

**(१) मेष -** या राशीच्या व्ययस्थानी असलेला मंगळ या राशीच्या मंडळींना संपूर्ण महिन्याच्या काळात
प्रतिकुल व मनस्तापदायक होणार आहे. हट्टी, संतापी, अहंकारी स्वभाव, अस्वस्थ मनस्थिती, मनस्ताप, आर्थिक चिंता, वाद, भांडणे, अकारण श्रम, दगदग अशापैकी कारणांनी बेचैन होणे संभवते.
मंगळ ग्रहासोबत असलेल्या हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी, धाक, दडपण सहन न होणारा असा होणार आहे. या हर्षलमुळे या राशीची लहान मुले तर सध्या अतिशय वांड, खोडकर, हूड अशा प्रकारची झाली असण्याची शक्यता आहे. पण असे असले तरी हा हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत असलेले शुक्र व राहू हे दोन्ही ग्रह अनुकुल व लाभदायक होतील. शुक्रामुळे काही मंडळींना धनलाभ, काहींना भूमिलाभ, मानाचे स्थान, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होणे संभवते. राहूमुळे हातून मोठे कर्तृत्व घडेल. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि ग्रह या संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख लाभेल. पण या बुधामुळे धननाश होणे संभवते. शिवाय महिन्याच्या उत्तरार्धात तोही प्रतिकुलच होईल व त्यामुळे संतती-स्त्रीपासून मनस्ताप होणे संभवते. जपा. .या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत वक्री गुरु व केतु असून येथील केतूमुळे या राशीच्या काही मंडळींचे आचरण धूर्त, ढोंगी स्वरूपाचे होईल. शिवाय काहीही कारणाने संततिसुखात बाधा येणे संभवते. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील. अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना कीर्ति - प्रसिद्धी लाभेल. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत असलेला शनि ग्रह लोखंड, पोलाद, कोळसा याचा व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेला नेपच्यूनही प्रतिकुलच असून त्याच्यामुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीस विलंब, कुमार्गी मित्रांमुळे होणारे नुकसान अशापैकी घटना घडतील व नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. शिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "अश्विनीकुमाराभ्याम नमः " मंत्राचा, भरणी जन्मनक्षत्र असणारांनी " ओम यमाय नमः " मंत्राचा आणि कृत्तिका जन्मनक्षत्र असणारांनी "ओम अग्नये नमः " मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या धनस्थानी स्वराशीत शुक्र असून सोबत राहूही आहे. हा शुक्र कौटुंबिक सुखास व कौटुंबिक प्रगतीस अनुकुल असला तरी सोबत असलेला राहू त्यात बाधा आणण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून येथील रवि सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना अनुकुल होईल. काही मंडळींना बढती मिळेल, काहींना पगारवाढ मिळेल, वरिष्ठ कामाचे कौतुक करतील. क्वचित कोणास मानाचे स्थान किंवा उच्च पद मिळणेही संभवते. पण बुध ग्रह प्रतिकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर उलट परिस्थिती होईल. बुध ग्रह बराचसा अनुकुल होईल व रवि ग्रह मात्र पूर्णपणे प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या अष्टम स्थानी स्वतः:च्या धनु राशीत वक्री गुरु ग्रह असून त्याच्या सोबत केतूही आहे. येथील केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच कुटुंबात .कलह, भांडणे होणे संभवते. आरोग्यदृष्ट्याही हा केतू प्रतिकुल असून काही मंडळींना त्वचारोग, रक्तविकार, मुखदंत रोग अशापैकी आजार होणे संभवते. जपा. त्याशिवाय अपघात भयही संभवते. पण गुरु ग्रह अनुकुल असून ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने असा धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी स्वतः:च्या मकर राशीत शनि ग्रह आहे. तो सर्वसाधारण शुभ असून तीव्र अशुभ असा नाही. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील. पण मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना हा नेपच्यून अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत मंगळ असून त्यामुळे कष्ट -परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. काही मंडळींना एखादी मौल्यवान वस्तू मिळणेही संभवते. पण या मंगळामुळे मित्रांशी वितुष्ट निर्माण होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ व्ययस्थानी गेल्यावर पूर्णपणे अशुभ होईल. त्याच्या सोबत हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असून हे दोन्ही ग्रह अत्यंत प्रतिकुल असून त्यांच्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. आर्थिक चिंता त्रस्त करतील, मानहानी होईल, शत्रुत्व निर्माण होईल. काही मंडळींना जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याचप्रमाणे दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” मंत्राचा, रोहिणी जन्मनक्षत्र असणारांनी “ओम ब्रह्माय नमः:” मंत्राचा व मृग जन्मनक्षत्र असणारांनी “ओम सोम सोमाय नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम स्थानी राहू आणि शुक्र असून हा राहू स्वराशीत आहे व तो शुक्राचा मित्रही आहे. त्यामुळे सुखसमाधान लाभेल. पण राहूमुळे अपमान होणे संभवते. असा अपमान झाल्यास मनात सूडभावना निर्माण होईल. जपा. शिवाय या राहूमुळे काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत रवि - बुध असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील. रविमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील व काही मंडळींना नेत्रविकाराचा त्रास होणे संभवते. शिवाय वाद, भांडणे होणेही शक्य आहे. बुध ग्रह दु:खदायक होणार असला तरी तो धनदायकही होईल. महिन्याच्या उत्तरार्धात येथील दोन्हीही ग्रह

या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर रवि ग्रह पूर्णपणे अनुकुल होईल व त्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सुखसमाधान लाभेल, या राशीच्या नोकदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्ध खूपच अनुकुल व लाभदायक होईल.. पण बुध ग्रहामुळे हितशत्रूंपासून त्रास होईल. अकारण शत्रुत्व निर्माण होईल. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु ग्रह असून सोबत केतूही आहे. येथील केतुमुळे मनस्थिती अस्थिर राहील. वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे ज्यांचे प्रेमसंबंध असतील त्यांनी वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी प्रेमसंबंधात बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. पण काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. काही मंडळींना प्रवासयोग येईल, तर काही मंडळींना अर्थलाभ होईल. या राशीच्या अष्टम स्थानी स्वतः:च्या मकर राशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे अनारोग्य, असमाधानकारक घटना, अपेक्षाभंग अशा घटना घडणे संभवते. त्यामुळे मनस्थिती अशांत राहील. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला नेपच्यून शुभ असून ज्यांना अध्यात्मात रस आहे अशांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील, तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत मंगळ असून तो औषधविक्रेत्यांना व यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. इतरांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. वरिष्ठांशी मतभेद होतील. काही मंडळींना हातचे सोडून नवे काही करावेसे वाटेल. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. या लाभस्थानी मंगळासोबत असलेल्या हर्षलमुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते. काही मंडळींना प्रवासयोग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज स्नान झाल्यावर श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र
आर्द्रा आहे त्यांनी " ओम शंकराय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी " ओम
आदितीये नमः: " मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत रवि व बुध असून हे दोनही ग्रह या महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी जात आहेत. पण हे दोन्ही ग्रह या संपूर्ण महिन्याच्या काळात या
राशीच्या मंडळींना प्रतिकुल होतील. रविमुळे अनारोग्य, मनस्ताप, चिंता त्रस्त करतील. त्यामुळे थकावट जाणवेल. महिन्याच्या उत्तरार्धात नेत्रविकाराचा आजार त्रस्त करील. बुधामुळे धननाश, मित्रद्रोह होणे संभवते. चित्त चंचल होईल व काही मंडळींना कुसंगतीची बाधा होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात या बुधामुळे धनलाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु ग्रह असून सोबत केतूही आहे. गुरूमुळे आरोग्य उत्तम राहील, सुखसमाधान लाभेल, व हा गुरु ग्रह दशम स्थानी असलेल्या नोकरी-व्यवसायास पूरक होईल. त्याला केतूचीही साथ मिळेल. या राशीच्या सप्तम स्थानी स्वतः:च्या मकर राशीत शनि ग्रह असून तो अनारोग्यकारक होणे संभवते. चित्तवृत्ती शांत राहील, पण विवाहेच्छूचे विवाह ठरण्यात अडचणी निर्माण होतील. .या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत असलेला नेपच्यून जलभयकारक व

विषभयकारक असल्यामुळे जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत मंगळ असल्यामुळे शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होण्याची शक्यता आहे. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी स्वतःच्या मेष राशीत प्रवेश करील . तेव्हा तो औषधविक्रेते व यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण इतर व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. दशम स्थानी असलेल्या मंगळासोबत हर्षल पण आहे. हा हर्षल नोकरीव्यवसाय काहीही असो, सर्वांनाच लाभदायक होईल. विशेष करून बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी मिथुन राशीत शुक्र व राहू असे दोन ग्रह असून स्वराशीतील राहूमुळे अर्थलाभ, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. पण शुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " श्रीशिवलिलामृत स्तोत्रा"चे व "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना पुनर्वसू जन्मनक्षत्र असणारांनी "ओम अदितीये नमः:" मंत्राचा, पुष्य जन्मनक्षत्र असणारांनी "ओम बृहस्पतये नमः:" मंत्राचा, आणि आश्लेषा जन्मनक्षत्र
असणारांनी " ओम सर्पाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत रवि -बुध असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी सिंह राशीत जात आहेत. हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार आहेत. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य, चंचल, अस्थिर, अस्वस्थ मनस्थिती, आर्थिक चिंता, मनस्ताप, धननाश, कुसंगती, मित्रद्रोह अशापैकी मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी मन सतत शांत व स्थिर राखण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह केंद्रस्थानी स्वतः:च्या मालकीच्या सिंह राशीत येत असल्याने काही प्रमाणात अनुकुल होईल व मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या पंचम स्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु व केतू असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनुकुल असले तरी गुरु ग्रह वक्री असल्याने प्रेमसंबंधात बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल; पण अपेक्षित प्रगती होईल की नाही, हे सांगता येत नाही. अर्थलाभ होईल. गुरुसारख्या शुभ ग्रहासह केतू असल्याने ज्यांना अध्यात्माची मनापासून ओढ आहे त्यांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल.. गूढ अभ्यासात रस असणारांना प्रगतीसाठी काळ
होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि असून तो दशम स्थानास पूरक होईल. तसेच त्याच्यामुळे शत्रुत्व निर्माण होणे, अनारोग्य होणे, गैरसमजुतीमुळे भांडणे होणे संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत मंगळ असून तो अनारोग्यकारकच होईल. त्याच्यामुळे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. विशेष करून मूळव्याधीसारखे आजार होणे संभवते. त्याचप्रमाणे हाडमोड होण्याची शक्यता असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा.

त्याशिवाय वीज व पाणी यांपासून धोका असल्याने जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहू नका. तसेच विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत हर्षल असून महिन्याच्या उत्तरार्धात अष्टम स्थानी असलेला मंगळ भाग्यस्थानी जात आहे. म्हणून महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. पण येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. शिवाय या हर्षलमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून सोबत शुक्रही आहे. त्यामुळे शुक्र ग्रह जरी पूर्णपणे अनुकुल असला तरी येथील राहू या राशीच्या अधिकारी मंडळींना अधिकाराचा गैर उपयोग करून वाममार्ग धन मिळविण्यास प्रवृत्त करील. जपा. मनावर ताबा ठेवा. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जुगाराच्या नादी लागू नका. तसेच ह्या राहूमुळे संततिविषयक चिंता त्रस्त करील. श्रद्धा असेल तर श्रीगायत्रीदेवीची उपासना अनुकुल होईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " गायत्रीमंत्रा"चा बारा वेळा जप करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी " ओम आर्यमे नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच सर्व प्रकारे अनुकुल व लाभदायक होईल. म्हन त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. महिन्याचा उत्तरार्ध पूर्णपणे प्रतिकुल होणार असल्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, मानहानी होणे संभवते. कारण रवि -बुध दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारे अनुकुल व लाभदायक आहेत; पण उत्तरार्धात पूर्णपणे प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या दशम स्थानी मिथुन या स्वराशीत राहू व सोबत शुक्र आहे. येथील शुक्र स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना प्रतिकुल होणार असून त्यांच्या व्यापार-व्यवसायात अडचणी, अडथळे येणे संभवते. पण राहूमुळे नोकरीत सत्ता, अधिकार, सन्मान, यश प्राप्त होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मेष या स्वराशीत जात आहे. त्याच्या सोबत अष्टम स्थानी हर्षलही आहे. त्यामुळे हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होतील. त्यामुळे जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्य, दोघांतील वाद, भांडणे, गैरसमज यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज आदि कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. महिन्याच्या उत्तरार्धात उष्णताविकारांनी अनारोग्य होणे संभवते. विशेष करून मूळव्याधीचा आजार त्रस्त करील. त्याशिवाय जलभय, वीजभय आहेच. त्यामुळे पाण्यापासून जपा, विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. तसेच हर्षलमुळे अपघात भयही आहे. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असल्यामुळे या राशीच्या काही मंडळींना उगीचच एखादी आजारभावना त्रस्त करील. काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करील. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह आहे. त्याच्यामुळे चिकाटीचा गुण वाढेल. पण वृत्ती स्वार्थी, संशयी होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु असून सोबत केतूही आहे. येथील केतूमुळे कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय हा केतू विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. येथील गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल.; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला

जाणे संभवते. पण हा गुरु वक्री असल्यामुळे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार होणार असतील तर त्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" मंत्राचा, जन्मनक्षत्र हस्त असणारांनी " ओम सूर्याय नमः:" मंत्राचा व जन्मनक्षत्र चित्रा असणारांनी "ओम त्वष्टे नमः:" मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या संपूर्ण महिन्यात या राशीच्या दशम व लाभस्थानी रवि -बुध हे अनुकुल ग्रह असल्यामुळे या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनलाभ, मित्रलाभ होईल. नोकरीत कोणास बढती, कोणास अधिकारपद, क्वचित कोणास उच्च पद मिळणेही शक्य आहे. या राशीच्या तिसऱ्या स्थानी स्वराशीत वक्री गुरु व केतू असे दोन ग्रह आहेत. येथील केतू मनस्तापदायक होणे संभवते. पण आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. गुरु ग्रह वक्री असल्यामुळे प्रवासात त्रास होणे संभवते. पण या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. पण भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. दु:खदायक घटना घडतील. माता असेल तर मातेस अनारोग्याचा त्रास होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असल्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. हा नेपच्यून आध्यात्मिक उन्नतीस अनुकुल होईल. गूढसंशोधन कार्यात प्रगती होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत मंगळ आहे.

त्यामुळे या राशीच्या मंडळींना चोरी होण्याचा, आर्थिक नुकसान होण्याचा, अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. त्याशिवाय उष्णताविकार बळावून अनारोग्याचा त्रास होणेही संभवते. पण हा मंगळ औषध संशोधन कार्यास उपयुक्त होईल. हृदयविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर हा मंगळ व तेथे असलेला हर्षल हे दोन्ही ग्रह विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करतील. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी

मिथुन राशीत शुक्र व राहू असे दोन ग्रह आहेत. पैकी राहूमुळे प्रवासयोग येणे संभवते. शुक्रामुळे गुरुकृपा, थोरकृपा, सुसंगती प्राप्त होईल. काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करून "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा" चे व रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचलिसा स्तोत्राचे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः " मंत्राचा,

स्वाती जन्मनक्षत्र असणारांनी "ओम वायवे नमः" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः " मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या धनस्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु व केतू असे दोन ग्रह आहेत. येथील केतूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करील. पण गुरु ग्रह अनुकुल असल्यामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. उत्तम अर्थलाभ होईल. पण तो वक्री असल्यामुळे अडचणी, अडथळे सहन करूनच सर्व काही मिळेल. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती परिस्थितीत गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत मंगळ असून हा मंगळ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण तो संततिसुखाचे दृष्टीने तापदायक होईल. काही मंडळींना स्थावरसंबंधी त्रास, काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत प्रवेश करील. त्याच्या सोबत हर्षलही असेल. हे दोन्ही ग्रह अनारोग्यकारक होतील. मंगळामुळे शारीरिक उष्णता भडकून कोणाला ताप येईल, कोणाला दुखापत होईल, कोणाला अपप्रचाराचा त्रास होईल, चोरी होणेही संभवते. हृदयविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. आर्थिक नुकसान होणेही संभवते. पण हा मंगळ वैद्यकीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यास उपयुक्त होईल. पण त्यासाठी सतत खूप खोल विचार करत बसू नका. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकार त्रस्त करील. काही मंडळींना मुदतीचा ताप येणेही शक्य आहे. या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून सोबत शुक्रही आहे. येथील शुक्रामुळे काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थप्राप्ती होईल. काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते; तर काही मंडळींना वारसाहक्काने धनलाभ होण्याची शक्यता आहे. येथील राहूसुद्धा वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. या राशीच्या भाग्यस्थानी व दशम स्थानी रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होतील व महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होतील. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना रवि -बुध अनुकुल असल्यामुळे विविध प्रकारचे लाभ होतील. मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करून "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः: " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत वक्री गुरु व केतू आहे. या केतूमुळे वाहन धोका असल्यामुळे सतत सावधानतेने व नियंत्रित वेगाने वाहन चालवा. येथील स्वराशीतील गुरु बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. पण यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असल्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. नियोजित कार्यात अडथळे येण्याची शक्यता आहे. तसेच आर्थिक संकटे त्रस्त करतील. या

राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असल्यामुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील राहील. त्यामुळे आध्यात्मिक प्रगतीस व गूढ संशोधन कार्यास अनुकुल व यशदायक होईल. त्याशिवाय या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाची तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे कुटुंबात कटकटी, गैरसमज, भांडणतंटे, असमाधानकारक घटना घडणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत हर्षल असून महिन्याच्या उत्तरार्धात चतुर्थ स्थानी असलेला मंगळ हर्षलसोबत या राशीच्या पंचम स्थानी जात आहे. त्यामुळे तो वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस अनुकुल होईल. येथील हर्षलमुळे बौद्धिक व कलात्मक कार्यक्षेत्रातील मंडळींना उच्च प्रगती करणे सहज शक्य होईल. काहींना अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून त्यासोबत शुक्रही आहे. या राहूमुळे मनात कपटी विचार येतील. वाममार्ग धन मिळविण्याची प्रबळ इच्छा निर्माण होईल. जपा. पण शुक्र प्रेमविवाहास अनुकुल असला तरी राहू- मुळे त्यात बाधा येणे संभवते. तसेच विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात येथील राहूमुळे बाधा येणे संभवते. या संपूर्ण महिन्याच्या काळात या राशीच्या अष्टम आणि नवम स्थानी रवि -बुध असणार आहेत. त्यामुळे हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील. त्यांच्यामुळे अडचणी, अडथळे निर्माण होतील. मानहानी होईल. पण बुध ग्रह केवळ महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होईल व कार्यसिद्धी होऊन यश लाभेल. तसेच सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र मूळ असणारांनी " ओम निऋतये नमः:" मंत्राचा, पूर्वाषाढा जन्मनक्षत्र असणारांनी " ओम उदकाय नमः: " मंत्राचा व उत्तराषाढा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम स्थानी याच स्वराशीत शनि ग्रह असून तो स्वतः:च्या व जीवनसाथी/संगिनीच्या अनारोग्यास कारणीभूत होईल. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. कुटुंबात स्थलांतर होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता , आर्थिक घोटाळे, आर्थिक संकटे त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत मंगळ असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिम्मत वाढेल. हातून कर्तबगारी घडेल. त्यामुळे महत्त्वाकांक्षा वाढेल. पण इजा होणेही संभवते.

हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष या स्वतःच्या राशीत प्रवेश करील. त्या स्थानी हर्षलही आहे. या हर्षलमुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. कशातच सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही. आहे त्या परिस्थितीत वास्तुसुख लाभणार नाही. सतत तक्रारी करत राहाल.

महिन्याच्या उत्तरार्धात मंगळाची भर पडेल व कुटुंबात भांडणतंटे होतील, असमाधानकारक घटना घडतील, या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून त्यासोबत शुक्रही आहे. येथील राहूमुळे स्वभाव कपटी, धूर्त, कावेबाज होणे संभवते. पण या राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील. तसेच ज्यांचा अन्य जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे त्यांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होतील. पण या राहूमुळे विषभय असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. शुक्रामुळे या राशीच्या कलाकार मंडळींना

कलेतील उच्च गुणवत्ता असूनही अपेक्षित प्रगती करणे जमणार नाही. कलेतील प्रावीण्य दर्शविण्यास संधीच
मिळणार नाही. त्यामुळे काही कलाकार व्यसनाधीन होणे संभवते. या राशीच्या सप्तम-अष्टम स्थानी रवि-बुध हे दोन्ही ग्रह असणार आहेत. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून तो अनारोग्यकारक व अपयश देणारा तसेच संततिसुखात बाधा आणणारा असल्याचा अनुभव येईल. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल; पण उत्तरार्धात कार्यसिद्धी करणारा असल्याचा, यशदायक व सुखसमाधान देणारा असल्याचा अनुभव येईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करून "शिवलीलामृत स्तोत्रा "चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी " हनुमानचालिसा स्तोत्रा "चे पठण करा. त्याचप्रमाणे दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा, श्रवण जन्मनक्षत्र असणारांनी "ओम विष्णवे नमः:" मंत्राचा आणि धनिष्ठा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम वसवे नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असल्यामुळे सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येत असावे, असे वाटते. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत मंगळ असल्यामुळे काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना डोळ्याचे अनारोग्य, तर काही मंडळींना मान, घसा, दाढा यांच्यापैकी कसला तरी आजार अस्वस्थ करील. तसेच आर्थिक समस्याही त्रस्त करतील येणे असलेले धन मिळण्यास विलंब होईल; पण देणे असलेले धन मात्र द्यावेच लागेल. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत गेल्यावर अनुकुल होईल व त्यामुळे कर्तबगारी, महत्त्वाकांक्षा, हिम्मत वाढेल. पण इजा होण्याची शक्यता असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. या मंगळासोबत असलेल्या हर्षलमुळे उच्च बौद्धिक शक्ती, आकलनशाक्ती व स्मरणशक्ती प्राप्त होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून सोबत शुक्रही आहे. येथील शुक्र सर्व प्रकारच्या कलाकारांच्या कलेतील प्रगतीस अनुकुल होईल. पण येथील राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा राहू कमिशन, दलाली व्यवसाय असणाराना अनुकुल व लाभदायक होईल. या महिन्याच्या संपूर्ण काळात या राशीच्या षष्ठ व सप्तम स्थानी रवि -बुध हे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व भाग्योदयकारक होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तुलनात्मक दृष्ट्या बुध ग्रह अधिक प्रतिकुल होईल. रवि ग्रह अनारोग्यकारक होईल व काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. बुधामुळे दु:ख, भांडणे होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु व केतू असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह अनुकुल व मानसिक सुखसमाधान देतील. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. विवाहेच्छूना विवाहयोग येईल. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. केतूमुळे प्रवासाचे योग येतील. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, मानहानी होणे, मनस्तापदायक घटना घडणे संभवते. . आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना सहनशक्ती व मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज

सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी " ओम वसवे नमः:" मंत्राचा, जन्मनक्षत्र शततारका असणारानी "ओम वरुणाय नमः:" मंत्राचा आणि पूर्वाभाद्रपदा जन्मनक्षत्र असणारानी "ओम अजैकचरणाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम स्थानी मंगळ असल्यामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या हट्टी, चिडखोर, मानापमान फार असणारा, अकारण श्रम, दगदग करणारा, नोकरी -व्यवसायास प्रतिकुल असणारा असा घडला असावा, असे वाटते. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मेष या स्वतः:च्या राशीतच प्रवेश करत आहे. तेथे हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्यामुळे स्वभाव अधिकच अविचारी, अस्थिर, विचित्र आचरण करणारा, फटकळपणे बोलून समोरच्याचा अपमान करणारा असा झाला असण्याची दाट शक्यता वाटते. शिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करत असतील व अनारोग्याचा त्रासही होत असेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी स्वराशीत राहू व शुक्र असून राहूमुळे कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पण शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. तसेच शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. या महिन्याच्या संपूर्ण काळात रवि -बुध हे दोन्ही ग्रह या राशीच्या पंचम व षष्ठ स्थानी असणार आहेत. हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्यकारक, नोकरीस प्रतिकुल, संततिसुखात बाधा आणणारे, नातेवाईक मंडळीत दुरावा आणणारे असे होणार आहेत. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह सिंह या स्वराशीत जात आहे व रवि -बुध हे दोन्ही ग्रह दशम या नोकरी-व्यवसायाच्या स्थानास पूरक होणार असून भागोदयकारक होतील. या राशीच्या दशम स्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु व केतु असून येथील केतूमुळे या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची तीव्र इच्छा होईल. पण त्यांनी तसे काही करू नये. आहे ती नोकरीच मनापासून करावी. स्वराशीतील गुरु ग्रह बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल; पण नियोजित कार्यात प्रगती व यश मिळण्यासाठी अडचणी, अडथळे सहन करूनच सर्व काही मनासारखे होईल. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून सर्व बाबतीत अनुकुल होईल, अर्थलाभ होईल. पण संततीस त्रासदायक होईल. जपा. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो मानसिक व्यग्रता, चिंता निर्माण करण्याची शक्यता आहे. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यातील मंडळींना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" मंत्राचा, उत्तराभाद्रपदा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम अहिर्बुध्न्याय नमः: " मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====